UPSC Fever

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र. **F**

# Paper-II
# ECONOMICS

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ..................................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ..................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## DEC - 11213

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्याय प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

UPSC Fever

UPSC Fever

DEC-11213/II

# Economics
## Paper II
## अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'Determining people's preferences from observing their behaviour' is the basis of :
   (A) Indifference theory
   (B) Marshallian theory
   (C) Composite demand theory
   (D) Revealed preference theory

2. Marshallian demand analysis :
   (I) Assumes constant marginal utility of money.
   (II) Predicts unit price elasticity of demand for commodity.
   (A) (I) is correct but not (II)
   (B) (II) is correct but not (I)
   (C) Both (I) and (II) are correct
   (D) Both (I) and (II) are wrong

1. 'लोकांच्या वर्तनाच्या निरीक्षणावरुन त्यांची पसंती ठरविणे' हा या सिद्धान्ताचा आधार आहे :
   (A) समवृत्ती सिद्धान्त
   (B) मार्शलचा सिद्धान्त
   (C) संयुक्त मागणीचा सिद्धान्त
   (D) प्रकटित पसंती सिद्धान्त

2. मार्शलचे मागणीचे विश्लेषण :
   (I) पैशाची सीमान्त उपयोगिता स्थिर गृहित धरते.
   (II) वस्तूच्या मागणीची किंमत लवचिकता एक असल्याचे भाकित करते.
   (A) (I) बरोबर पण (II) नाही
   (B) (II) बरोबर पण (I) नाही
   (C) (I) आणि (II) दोन्ही बरोबर
   (D) (I) आणि (II) दोन्ही चूक

UPSC Fever



3. If production function exhibits constant returns to scale the total cost curve would be :

   (A) Positively sloping linear
   (B) Negatively sloping linear
   (C) Positively sloping non-linear
   (D) Negatively sloping non-linear

4. (I) Marginal rate of technical substitution measures curvature of an isoquant.

   (II) Elasticity of factor substitution measures slope of an isoquant.

   (A) (I) is correct but not (II)
   (B) (II) is correct but not (I)
   (C) Both (I) and (II) are correct
   (D) Both (I) and (II) are wrong

5. Suppose monopolist faces two markets with different price elasticities of demand at each price. The marginal cost of production is zero. The discriminating monopolist in each market will charge prices where elasticity of demand is :

   (A) equal to 0
   (B) equal to 1
   (C) > 1
   (D) < 1

3. जर उत्पादन फलन स्थिर अनुमाप प्रत्याय दर्शवत असेल, तर एकूण खर्च वक्र असे असतात :

   (A) धन प्रवणतेची सरळ रेषा
   (B) ऋण प्रवणतेची सरळ रेषा
   (C) धन प्रवणतेचा अरेषीय
   (D) ऋण प्रवणतेचा अरेषीय

4. (I) तांत्रिक सीमान्त पर्यायता दर समउत्पादन वक्राच्या वक्रतेचे मापन करतो.

   (II) आदानांची पर्यायता लवचिकता समउत्पादन वक्राच्या प्रवणतेचे मापन करते.

   (A) (I) बरोबर पण (II) नाही
   (B) (II) बरोबर पण (I) नाही
   (C) (I) आणि (II) दोन्ही बरोबर
   (D) (I) आणि (II) दोन्ही चूक

5. समजा मक्तेदाराच्या दोन बाजारातील मागणी वक्रांची लवचिकता प्रत्येक किंमतीला भिन्न असेल आणि उत्पादनाचा सीमान्त खर्च शून्य असेल. अशा परिस्थितीत किंमतभेद करणारा मक्तेदार प्रत्येक बाजारात अशी किंमत आकारेल कि जिथे मागणीची किंमत लवचिकता :

   (A) 0 असेल
   (B) 1 असेल
   (C) 1 पेक्षा जास्त असेल
   (D) 1 पेक्षा कमी असेल

UPSC Fever



6. Let long run marginal cost be denoted by LMC and long run average cost be denoted by LAC :

   (I) If (LMC/LAC) < 1, then there are economies of scale.

   (II) If (LMC/LAC) > 1, then there are diseconomies of scale.

   (A) (I) is correct but not (II)

   (B) (II) is correct but not (I)

   (C) Both (I) and (II) are correct

   (D) Both (I) and (II) are wrong

7. Which is *not* a correct prediction of Cournot model ?

   In equilibrium :

   (A) Industry profits are maximum

   (B) Profits of individual firms are maximum

   (C) The output is lower and price is higher than under perfect competition

   (D) The output is higher and price is lower than under monopoly

6. समजा दीर्घकालीन सीमान्त खर्चाचा निर्देश LMC ने केला आणि दीर्घकालीन सरासरी खर्चाचा निर्देश LAC ने केला, तर :

   (I) जर (LMC/LAC) < 1 तर अनुमापाची अनुकूलता असते

   (II) जर (LMC/LAC) > 1 तर अनुमापाची प्रतिकूलता असते

   (A) (I) बरोबर पण (II) नाही

   (B) (II) बरोबर पण (I) नाही

   (C) (I) आणि (II) दोन्ही बरोबर

   (D) (I) आणि (II) दोन्ही चूक

7. कुर्नो प्रतिमानाचे कुठले भाकित बरोबर **नाही** ?

   समतोलात :

   (A) उद्योगधंद्याचा नफा महत्तम असतो

   (B) वैयक्तिक उद्योग संस्थांचा नफा महत्तम असतो

   (C) पूर्ण स्पर्धेपेक्षा उत्पादन कमी आणि किंमत जास्त असते

   (D) मक्तेदारीपेक्षा उत्पादन जास्त आणि किंमत कमी असते

UPSC Fever



8. A utilitarian judges allocation by their effect on :
   (A) The worst off members of society
   (B) The rich members of society
   (C) Multiplication of individual utilities
   (D) Sum of individual utilities

9. Suppose Y = 1000, transfers (T) = 200 and the tax rate ($t$) = 0.20, the disposable income would be :
   (A) 1200
   (B) 800
   (C) 1000
   (D) 1400

10. Suppose the economy is in equilibrium in liquidity trap. Government increases its exogeneous investment by Rs. 1,000. If the marginal propensity to consume is 0.8, equilibrium income would increase by :
   (A) 1000
   (B) 500
   (C) 800
   (D) 200

8. उपयुक्ततावादी संसाधनांच्या वाटपाचा निवाडा या वाटपाच्या होणाऱ्या खालील परिणामाच्या आधारे करतो :
   (A) समाजातील तळातील लोकांवर होणारे परिणाम
   (B) समाजातील श्रीमंत लोकांवर होणारे परिणाम
   (C) वैयक्तिक उपयोगितांच्या गुणाकारावर होणारा परिणाम
   (D) वैयक्तिक उपयोगितांच्या बेरजेवर होणारा परिणाम

9. समजा Y = 1000, हस्तांतरीत रक्कम (T) = 200 आणि कर दर ($t$) = 0.20 असेल, तर खर्च करण्यायोग्य उत्पन्न खालीलपैकी कोणते राहील ?
   (A) 1200
   (B) 800
   (C) 1000
   (D) 1400

10. समजा अर्थव्यवस्था रोखतेच्या सापळ्यात समतोलावस्थेत आहे व सरकारने आपली बाह्य गुंतवणूक 1,000 रु. ने वाढवली, जर सीमांत उपभोग दर 0.8 असेल, तर समतोल उत्पन्नातील वाढ खालीलपैकी कोणती राहील ?
   (A) 1000
   (B) 500
   (C) 800
   (D) 200

UPSC Fever



11. The basic assumption of classical approach to determination of output and employment is :
    (A) Price flexibility and wage rigidity
    (B) Wage flexibility and price rigidity
    (C) Wage-price flexibility
    (D) Wage-price rigidity

12. Under adaptive expectations, the Phillips curve becomes vertical at the natural rate of unemployment :
    (A) In both the long run and the short run
    (B) In the long run but not in the short run
    (C) In the short run but not in the long run
    (D) Neither in the short, nor in the long run

11. उत्पन्न व रोजगाराच्या निर्धारणासंदर्भात सनातनवादी दृष्टिकोनाचे मूलभूत गृहीतक खालीलप्रमाणे आहे :
    (A) लवचिक किंमती व ताठर मजूरीदर
    (B) लवचिक मजूरीदर व ताठर किंमती
    (C) लवचिक मजूरीदर व किंमती
    (D) ताठर मजूरीदर व किंमती

12. स्वीकाराहार्य अपेक्षा (adaptive expectations) गृहितकाखाली फिलिप्स वक्र हा बेरोजगारीच्या नैसर्गिक दरावर खालीलप्रमाणे क्षितिजलंब असतो :
    (A) अल्प व दीर्घ, दोन्ही काळात
    (B) दीर्घकाळात क्षितिजलंब असतो परंतु अल्पकाळात क्षितिजलंब नसतो
    (C) अल्पकाळात क्षितिजलंब असतो पण दीर्घकाळात नसतो
    (D) अल्प व दीर्घ, दोन्ही काळात क्षितिजलंब नसतो

UPSC Fever



13. According to the Cambridge equation of demand for money, if nominal GDP rises by 2%, the money stock multiplied by velocity must rise by :

(A) 1%

(B) 3%

(C) 2%

(D) 4%

14. Friedman's demand for money theory shows that the demand for money declines as the ratio of human to non-human wealth increases because :

(A) It is easier to sell or purchase human wealth than non-human wealth

(B) It is easier to sell or purchase non-human wealth than human wealth

(C) It is easier to sell non-human wealth than human wealth but not to purchase

(D) It is easier to sell human wealth than non-human wealth but not to purchase

13. पैशाच्या मागणीच्या केंब्रिज समीकरणानुसार जर नाममात्र सकल देशीय उत्पादन जर 2% वाढले, तर पैशाचा साठा गुणिले चलनवेग खालीलप्रमाणे वाढेल :

(A) 1%

(B) 3%

(C) 2%

(D) 4%

14. फ्रिडमन ह्यांच्या पैशाच्या मागणीच्या सिद्धांतानुसार अमानवी संपत्तीचे मानवी संपत्तीशी असलेले गुणोत्तर वाढत असताना पैशाची मागणी घटते कारण :

(A) मानवी संपत्तीचे खरेदी-विक्री व्यवहार अमानवी संपत्तीच्या खरेदी-विक्री व्यवहारापेक्षा सुलभ असतात

(B) अमानवी संपत्तीचे खरेदी-विक्री व्यवहार मानवी संपत्तीच्या खरेदी-विक्री व्यवहारापेक्षा सुलभ असतात

(C) अमानवी संपत्तीची विक्री मानवी संपत्तीच्या विक्रीपेक्षा सुलभ असते परंतू अमानवी संपत्तीची खरेदी मानवी संपत्तीच्या खरेदीपेक्षा अवघड असते

(D) मानवी संपत्तीची विक्री अमानवी संपत्तीच्या विक्रीपेक्षा सुलभ असते परंतू मानवी संपत्तीची खरेदी अमानवी संपत्तीच्या खरेदीपेक्षा अवघड असते

UPSC Fever



15. Suppose currency is in the ratio 0.5 to deposits, reserve is in the ratio of 0.25 of deposits and high powered money is 1000, then the money supply is :

(A) 2000

(B) 2500

(C) 1500

(D) 1800

16. Which one of the following is *not* true in the simple Keynesian model ?

(A) The equilibrium is unique

(B) The equilibrium is stable

(C) The equilibrium exists

(D) The equilibrium is constant

17. Which of the following is the most essential feature of economic development ?

(A) Physical expansion of output

(B) Investment

(C) Structural transformation

(D) Surplus balance of payment

15. समजा चलनाचे ठेवींशी गुणोत्तर 0.5 असेल व राखिव रोखतेचे ठेवींशी प्रमाण 0.25 असेल व जननक्षम पैसा जर 1000 असेल, तर पैशाचा पुरवठा खालीलप्रमाणे असेल :

(A) 2000

(B) 2500

(C) 1500

(D) 1800

16. केन्सच्या प्रतिमानात खालीलपैकी कोणते विधान सत्य **नाही** ?

(A) समतोल एकमात्र असतो

(B) समतोल स्थिर असतो

(C) समतोल अस्तित्वात असतो

(D) समतोल अचल असतो

17. खालीलपैकी आर्थिक विकासाचे अत्यावश्यक व्यवच्छेदक लक्षण कोणते ?

(A) उत्पादनाचे भौतिक विस्तार

(B) गुंतवणूक

(C) संरचनात्मक परिवर्तन

(D) व्यवहार तोलाचे आधिक्य

18. Main focus of classical writers of development was on ............

    (A) Growth

    (B) Redistribution

    (C) Equity

    (D) Trade

19. For the capitalist enterprise, existence of disguised unemployment in the Lewis Model leads to ................ of labour.

    (A) Unlimited supply

    (B) Shortage of supply

    (C) Freezing of real wages

    (D) Increase in real wages

20. Match correctly concepts enlisted in List I with its proponent from List II and choose the correct answer from the codes given below :

| List I | | List II |
|---|---|---|
| (1) Perfectly Elastic Supply of Labour | (i) | Harvey Leibenstein |
| (2) Critical Minimum Effort | (ii) | Arthur Lewis |
| (3) Reserve Army of Unemployed | (iii) | David Ricardo |
| (4) Subsistence Real Wages | (iv) | Karl Marx |

*Codes* :

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | *(ii)* | *(i)* | *(iv)* | *(iii)* |
| (B) | *(i)* | *(ii)* | *(iv)* | *(iii)* |
| (C) | *(iii)* | *(i)* | *(ii)* | *(iv)* |
| (D) | *(ii)* | *(iii)* | *(iv)* | *(i)* |

18. सनातनवादी लेखकांचा विकासाच्या बाबत प्रमुख भर खालीलपैकी कशावर होता ?

    (A) वृद्धी

    (B) पुनर्वितरण

    (C) समानता

    (D) व्यापार

19. भांडवलशाही उपक्रमासाठी, लेव्हिस यांच्या प्रतिमानात अदृश्य बेरोजगारीमुळे खालीलपैकी कोणती परिस्थिती श्रमिकांच्या बाबतीत निर्माण होईल ?

    (A) अमर्यादित पुरवठा

    (B) पुरवठ्याची कमतरता

    (C) वास्तविक मजुरीचे गोठवणीकरण

    (D) वास्तविक मजुरीत वाढ

20. यादी I मधील दिलेल्या संकल्पनांशी यादी II मध्ये दर्शविलेल्या या संकल्पनांच्या जनकांशी योग्य जोड्या लावा आणि योग्य उत्तर दिलेल्या संकेतामधून निवडा :

| यादी I | | यादी II |
|---|---|---|
| (1) श्रमिकांचा पुरवठा पूर्णतया लवचिक | (i) | हार्वे लिबिन्स्टिन |
| (2) न्यूनतम क्रिटिकल प्रयत्न | (ii) | आर्थर लेविस |
| (3) बेरोजगारांची राखीव सेना | (iii) | डेव्हिड रिकार्डो |
| (4) निर्वाह वास्तविक मजुरी | (iv) | कार्ल मार्क्स |

**संकेतांक :**

| | (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|---|
| (A) | *(ii)* | *(i)* | *(iv)* | *(iii)* |
| (B) | *(i)* | *(ii)* | *(iv)* | *(iii)* |
| (C) | *(iii)* | *(i)* | *(ii)* | *(iv)* |
| (D) | *(ii)* | *(iii)* | *(iv)* | *(i)* |

UPSC Fever



21. What is *not* true regarding the Solow Neo-classical Growth Model ?
    (A) Substitution between labour and capital is possible
    (B) Labour and capital are subject to increasing returns
    (C) It is more suited to developed economy than developing one
    (D) It is basic framework for study of convergence across countries

22. The Schumpeterian development implies .............
    (A) rise in real wages of workers
    (B) achieving and maintaining of full-employment level in the economy
    (C) growth along with qualitative changes in the economy
    (D) acceleration in the factor productivity

23. The main focus of the 12th Five Year Plan of India is .............
    (A) work, food and equity
    (B) employment, efficiency and sustainability
    (C) equity, efficiency and self reliance
    (D) faster, more inclusive and sustainable growth

21. सोलो नवसनातनवादी वृद्धी प्रतिमानाच्या संदर्भात खालीलपैकी कोणती बाब सत्य **नाही** ?
    (A) श्रमिक आणि भांडवल यातील पर्यायतेची शक्यता
    (B) श्रम आणि भांडवलाचा फलन दर वाढता राहील ही अट
    (C) विकसित अर्थव्यवस्थांसाठी विकसनशील राष्ट्रांपेक्षा अधिक योग्य
    (D) विविध राष्ट्रांमधील भेद कमी होत असल्यास त्या बाबतचा अभ्यास करण्यासाठी मूलभूत चौकट

22. शुम्पीटर प्रणीत विकासात कुठली बाब अभिप्रेत आहे :
    (A) श्रमिकांच्या वास्तविक मजुरीत वाढ
    (B) अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगाराचा स्तर प्राप्त करून तो टिकवून ठेवणे
    (C) अर्थव्यवस्थेत वृद्धी समवेत गुणात्मक बदल घडविणे
    (D) घटक उत्पादकतेला चालना देणे

23. 12व्या पंचवार्षिक योजनेचा प्रमुख भर खालीलपैकी कशावर होता ?
    (A) काम, अन्न आणि समानता
    (B) रोजगार, कार्यक्षमता आणि शाश्वती
    (C) समानता, कार्यक्षमता आणि स्वावलंबन
    (D) जलद, अधिक सर्वसमावेशक आणि शाश्वत वृद्धी

24. The effective rate of taxation is a ratio of :

(A) tax revenue collected to the tax base

(B) total revenue to gross domestic product

(C) current revenue to the tax base

(D) non-tax revenue to the total expenditure

25. The 14th Finance Commission is constituted under the Chairmanship of :

(A) Dr. Sudipto Mundle

(B) Dr. Y.V. Reddy

(C) Dr. Kaushik Basu

(D) Dr. Raghuram Rajan

24. प्रभावी कर दर म्हणजे :

(A) कर आधाराशी कर महसूल वसुलीचे प्रमाण

(B) राष्ट्रीय उत्पन्नाशी एकूण महसूलाचे प्रमाण

(C) कर आधाराशी चालू महसूलाचे प्रमाण

(D) एकूण खर्चाशी करेत्तर महसूलाचे प्रमाण

25. चौदाव्या वित्त आयोगाची स्थापना कोणाच्या अध्यक्षतेखाली झाली आहे ?

(A) डॉ. सुदीप्तो मंडल

(B) डॉ. वाय. व्ही. रेड्डी

(C) डॉ. कौशिक बसू

(D) डॉ. रघुराम राजन

UPSC Fever



26. The excess of expenditure excluding interest payments over revenue is .............

(A) Current Account Deficit

(B) Effective Revenue Deficit

(C) Primary Deficit

(D) Revenue Deficit

27. The enormous amount of tax expenditure :

(A) increases effective rate of taxes

(B) increases rate of taxes

(C) reduces rate of interest

(D) reduces effective rate of taxes

28. According to whom the least aggregate sacrifice is superior principle of tax distribution ?

(A) Musgrave R.A.

(B) Solow R.M.

(C) Seligman E.R.

(D) Pigou A.C.

26. व्याजाची देणी वजा जाता राहिलेला खर्च जर महसूलापेक्षा अतिरिक्त असेल, तर त्या अतिरिक्त खर्चास .................... म्हणतात.

(A) चालू खात्यावरील तूट

(B) प्रभावी महसूली तूट

(C) प्राथमिक तूट

(D) महसुली तूट

27. कर खर्च जास्त असल्यास .............

(A) प्रभावी कराचा दर वाढतो

(B) कराचा दर वाढतो

(C) व्याजाचा दर कमी होतो

(D) प्रभावी कराचा दर कमी होतो

28. कोणाच्या मते अल्पतम एकूण त्याग हे कर वाटपाचे सर्वोत्तम तत्व आहे ?

(A) मसग्रेव्ह आर.ए.

(B) सोलो आर.एम.

(C) सेलिग्मन इ.आर.

(D) पिगू ए.सी.

UPSC Fever



29. A wide gap between the ratio of non-debt receipts to Gross Domestic Product and the ratio of total expenditure to Gross Domestic Product essentially reflects the extent of :

(A) primary deficit

(B) fiscal deficit

(C) effective revenue deficit

(D) revenue deficit

30. Net collection of National Small Saving Fund is invested in :

(A) Shares of Public Sector Undertakings

(B) Government Bonds

(C) Central and State Governments Securities

(D) Venture Capital Bonds

29. राष्ट्रीय उत्पन्नाशी एकूण कर्जेतर महसूलाचे प्रमाण आणि एकूण खर्चाचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण यातील फरक मूलतः ............... प्रतिबिंबित करतो.

(A) प्राथमिक तूट

(B) राजकोषीय तूट

(C) प्रभावी महसूली तूट

(D) महसूली तूट

30. राष्ट्रीय अल्पबचत निधीतील निव्वळ वसुली गुंतविली जाते :

(A) सार्वजनिक उपक्रमांच्या भाग-भांडवलामध्ये

(B) सरकारी रोख्यात

(C) केंद्र आणि राज्यांच्या प्रतिभूतीत

(D) साहसी भांडवल निधीमध्ये

UPSC Fever



31. In a two-country two-good model, country A is labour abundant and country B is capital abundant. Good X is capital-intensive and good Y is labour-intensive. Which of the following is *correct* ?

(A) A imports X and exports Y

(B) A exports X and imports Y

(C) B imports X and exports Y

(D) A exports both X and Y

32. Intra-industry trade is ...........

(A) Trade between two industries in a country

(B) Trade within an industry in a country

(C) Trade between two industries in two different countries

(D) Trade between two countries of goods in the same industry

31. दोन देश आणि दोन वस्तूंच्या प्रतिमानामध्ये 'अ' देश श्रम प्रधान आहे व 'ब' देश भांडवल प्रधान आहे. 'क्ष' वस्तू भांडवल प्रधान आहे तर 'य' वस्तू श्रम प्रधान आहे. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(A) 'अ' देश 'क्ष' ची आयात करतो व 'य' ची निर्यात करतो

(B) 'अ' देश 'क्ष' ची निर्यात करतो व 'य' ची आयात करतो

(C) 'ब' देश 'क्ष' ची आयात करतो व 'य' ची निर्यात करतो

(D) 'अ' देश 'क्ष' आणि 'य' या दोन्ही वस्तूंची निर्यात करतो

32. उद्योगांतर्गत व्यापार म्हणजे ..............

(A) देशातील दोन उद्योगांमधील व्यापार

(B) देशातील एका उद्योगांतील व्यापार

(C) दोन भिन्न देशांतील दोन उद्योगांमधील व्यापार

(D) दोन देशांमधील त्याच उद्योगांतील वस्तूंचा व्यापार

UPSC Fever



33. Both the merchandise trade account and the current account are in deficit in a country, but the deficit in the trade account is larger than that in the current account. This implies that :

(A) Capital accounts (excluding the changes in reserves) is in surplus

(B) Capital accounts (excluding the changes in reserves) is in deficit

(C) Invisibles account (including transfer payments) is in surplus

(D) Invisibles account (including transfer payments) is in deficit

34. In a partial equilibrium analysis, tariff is imposed on a good that is being imported. Which of the following is *true* ?

(A) Consumer surplus increases

(B) Consumer surplus decreases

(C) Producer surplus decreases

(D) Tax revenue decreases

33. एका देशाच्या बाबत वस्तूंचा व्यापार व चालू खाते हे दोन्ही तूट दर्शवितात, परंतु वस्तू व्यापारातील तूट ही चालू खात्यावरील तुटीपेक्षा अधिक आहे, यावरून असे सूचित होते की :

(A) राखीव निधीतील बदल वगळता भांडवली खाते शिलकी आहे

(B) राखीव निधीतील बदल वगळता भांडवली खाते तुटीचे आहे

(C) हस्तांतरित देणी समाविष्ट असलेले अदृश्य खाते शिलकी आहे

(D) हस्तांतरित देणी समाविष्ट असलेले अदृश्य खाते तुटीचे आहे

34. अंशत: समतोलांतर्गत आयात वस्तूवर कर आकारला जातो. खालीलपैकी कोणते विधान **सत्य** आहे ?

(A) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य वाढते

(B) उपभोक्त्याचे संतोषाधिक्य घटते

(C) उत्पादकाचे संतोषाधिक्य घटते

(D) कर महसूल घटतो

UPSC Fever



35. Which of the following denotes an increasing order of economic integration ? (CU : Customs Union, EU : Economic Union, FTA : Free Trade Area, PTA : Preferential Trade Arrangement) :

(A) FTA—PTA—CU—EU

(B) PTA—FTA—EU—CU

(C) PTA—FTA—CU—EU

(D) FTA—CU—PTA—EU

36. The Brettonwoods system is best described as a system of :

(A) Fixed exchange rates

(B) Pegged exchange rates

(C) Adjustably pegged exchange rates

(D) Flexible exchange rates

37. In 2012-13, India's current account deficit as a percentage of her GDP was :

(A) 1.8 per cent

(B) 2.8 per cent

(C) 3.8 per cent

(D) 4.8 per cent

35. आर्थिक एकात्मीकरणाचे वाढते प्रमाण खालीलपैकी कोणत्या पर्यायाने दर्शविले जाते ? (CU = कस्टम्स् युनियन, EU = इकॉनॉमिक युनियन, FTA = फ्री ट्रेड एरिया, PTA = प्रीफरेन्शीयल ट्रेड अरेंजमेंट) :

(A) FTA—PTA—CU—EU

(B) PTA—FTA—EU—CU

(C) PTA—FTA—CU—EU

(D) FTA—CU—PTA—EU

36. ब्रिटनवूड्स प्रणालीचे सुयोग्य वर्णन ............ होऊ शकेल.

(A) स्थिर विनिमय दर

(B) खिळवून ठेवलेले विनिमय दर

(C) समायोजित खिळवून ठेवलेले विनिमय दर

(D) लवचिक विनिमय दर

37. सन 2012-13 मध्ये भारतातील चालू खात्यावरील तुटीचे स्थूल देशांतर्गत उत्पादनाशी प्रमाण ............ होते.

(A) 1.8 टक्के

(B) 2.8 टक्के

(C) 3.8 टक्के

(D) 4.8 टक्के

UPSC Fever



38. In ............... the committee headed by ............ was appointed in India to make suggestions for correction in the balance of payments.
(A) 1983, Vijay Kelkar
(B) 1993, P.C. Alexander
(C) 1995, Prakash Tandon
(D) 1993, C. Rangarajan

39. The gap between GNP and NNP refers to :
(A) Consumer expenditure on goods and services
(B) Indirect tax revenue
(C) Capital depreciation
(D) Direct tax revenue

40. According to the 2011 census which is the correct descending order of population of cities in India ?
(A) Greater Mumbai, New Delhi, Kolkata, Chennai
(B) Greater Mumbai, Kolkata, New Delhi, Chennai
(C) New Delhi, Greater Mumbai, Kolkata, Chennai
(D) Greater Mumbai, Chennai, New Delhi, Kolkata

38. आंतरराष्ट्रीय व्यवहारातोलात सुधारणा सुचवण्यासाठी भारत सरकारने ............... या वर्षी .................. यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली.
(A) 1983, विजय केळकर
(B) 1993, पी.सी. अलेक्झांडर
(C) 1995, प्रकाश टंडन
(D) 1993, सी. रंगराजन

39. स्थूल राष्ट्रीय उत्पादन व नक्त राष्ट्रीय उत्पादन यातील फरक ............... यामुळे असतो.
(A) ग्राहकांचा वस्तू व सेवांवरील खर्च
(B) अप्रत्यक्ष करांचे महसूल
(C) भांडवलावरील घसारा
(D) प्रत्यक्ष कर महसूल

40. सन 2011 च्या शिरगणतीनुसार लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील शहरांचा योग्य उतरता क्रम कोणता ?
(A) बृहन्मुंबई, नवी दिल्ली, कोलकता, चेन्नई
(B) बृहन्मुंबई, कोलकता, नवी दिल्ली, चेन्नई
(C) नवी दिल्ली, बृहन्मुंबई, कोलकता, चेन्नई
(D) बृहन्मुंबई, चेन्नई, नवी दिल्ली, कोलकता

UPSC Fever



41. (I) In India, certificates of deposits and commercial papers are transacted in the money market.

(II) Stock exchanges are the part of money market in India.

What can you say about these statements ?

(A) Statement (I) is wrong and statement (II) is correct

(B) Statement (I) is correct and statement (II) is wrong

(C) Both the statements are wrong

(D) Both the statements are correct

42. The annual financial statement presented to both the Houses of Parliament in India is as per ............ of the Indian Constitution.

(A) Article 112

(B) Article 268

(C) Article 280

(D) Article 74

41. (I) भारतात चलन बाजारात सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट व कमर्शिअल पेपर यांचे व्यवहार होतात.

(II) भारतात शेअर बाजार हे चलन बाजाराचाच एक भाग आहेत.

वरील विधानांबाबत तुम्ही काय म्हणाल ?

(A) विधान (I) चूक आहे व विधान (II) बरोबर आहे

(B) विधान (I) बरोबर आहे व विधान (II) चूक आहे

(C) वरील दोन्ही विधाने चूक आहेत

(D) वरील दोन्ही विधाने बरोबर आहेत

42. भारतातील संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये वार्षिक वित्तीय विवरण भारतीय राज्यघटनेच्या ...... अनुसार सादर केले जाते.

(A) कलम 112

(B) कलम 268

(C) कलम 280

(D) कलम 74

UPSC Fever



43. The main disadvantage of Wholesale Price Index (WPI) in India is that it :
    (A) is available only at current prices
    (B) is published only annually
    (C) has become outdated
    (D) does not cover the services sector

44. According to the Kyoto Protocol, the emission level of Green House Gases is to kept at .............. below the 1990 level.
    (A) 5.2%
    (B) 6.4%
    (C) 4.1%
    (D) 6.2%

45. In a class of 8 students mean marks obtained by students is 13 in statistical methods and in another class of 12 students of the same subject, the mean marks obtained by them is 8. What is the combined mean of the marks obtained by the students of two classes ?
    (A) 8
    (B) 10
    (C) 12
    (D) 14

43. भारतातील घाऊक किंमत निर्देशांतील मुख्य दोष म्हणजे ...............
    (A) तो फक्त चालू किंमतींना उपलब्ध असतो
    (B) तो फक्त वर्षातून एकदा प्रसिद्ध होतो
    (C) तो कालबाह्य झाला आहे
    (D) त्यात सेवा क्षेत्राचा समावेश केला जात नाही

44. क्योटो करारानुसार हरित गृह वायूंच्या उत्सर्जनाचे प्रमाण 1990 च्या पातळीपेक्षा ............. ने कमी ठेवण्याचे ठरले.
    (A) 5.2%
    (B) 6.4%
    (C) 4.1%
    (D) 6.2%

45. सांख्यिकी पद्धती या विषयात 8 विद्यार्थी असलेल्या एका वर्गातील विद्यार्थ्यांना सरासरी 13 गुण प्राप्त झाले आणि दुसऱ्या वर्गातील 12 विद्यार्थ्यांना याच विषयात सरासरी 8 गुण प्राप्त झाले. या दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना प्राप्त झालेले संयुक्त सरासरी गुण किती ?
    (A) 8
    (B) 10
    (C) 12
    (D) 14

UPSC Fever



46. In a class of 25 students everyone has secured 15 marks. What is the value of standard deviation of marks ?

(A) Five

(B) Fifteen

(C) One

(D) Zero

47. What is the value of Pearson's Coefficient of Skewness for the distribution having mean value 50, median value 47 and value of standard deviation 3 ?

(A) 3

(B) 2

(C) 1

(D) 1.5

48. Find out standard deviation for the binomial distribution having $n = 49$, $p = 0.5$ :

(A) 1.5

(B) 2

(C) 3

(D) 3.5

46. 25 विद्यार्थी संख्या असलेल्या एका वर्गात प्रत्येक विद्यार्थ्याने 15 गुण प्राप्त केले. या प्राप्त गुणांचे प्रमाणित विचलन मूल्य किती ?

(A) पाच

(B) पंधरा

(C) एक

(D) शुन्य

47. सरासरी मूल्य 50, मध्यगा मूल्य 47 आणि प्रमाणित विचलन मूल्य 3 असलेल्या वितरणासाठी पिअरसनच्या असममितीच्या गुणकाचे मूल्य कोणते राहील ?

(A) 3

(B) 2

(C) 1

(D) 1.5

48. $n = 49$, $p = 0.5$ हे मूल्य असलेल्या द्विपद वितरणाचे प्रमाणित वितरण शोधून काढा :

(A) 1.5

(B) 2

(C) 3

(D) 3.5

UPSC Fever



49. Regression equation of Y on X is given as Y = 30 + 0.4 X whereas regression equation of X on Y is given as X = 60 + 0.9 Y. What is the value of correlation coefficient between X and Y ?

(A) 0.6

(B) 0.9

(C) 0.36

(D) 0.4

50. In order to verify statistical significance of 'β' in linear regression equation Y = α + βX,. Which of the following is used ?

(A) F-test

(B) Chi-square test

(C) *z*-test

(D) *t*-test

49. Y वरील X चे प्रतिपगमन समीकरण Y = 30 + 0.4 X असे असून X वरील Y चे प्रतिपगमन समीकरण X = 60 + 0.9 Y हे आहे. X आणि Y यांच्यामधील सहसंबंध गुणाकांचे मूल्य किती ?

(A) 0.6

(B) 0.9

(C) 0.36

(D) 0.4

50. Y = α + βX या रेषीय प्रतिपगमन समीकरणातील β च्या मूल्याची सांख्यिकीय लक्षणीयता पडताळून बघावयाची असल्यास खालीलपैकी कोणत्या चाचणीचा उपयोग करण्यात येतो ?

(A) F-चाचणी

(B) काय-स्क्वेअर चाचणी

(C) *z*-चाचणी

(D) *t*-चाचणी

ROUGH WORK

UPSC Fever



ROUGH WORK